जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मंगळवार दि.१ ऑक्टोबर २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : २९
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# कापूस-सोयाबीन अनुदान योजना शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी

## ४९ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात २३९८ कोटी रुपये अनुदान वितरित

**राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिलेल्या शब्दांनुसार मागील वर्षी भाव पडल्याने नुकसान झालेल्या राज्यातील सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रुपये प्रमाणे अर्थसहाय्य करण्याच्या योजनेतुन आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते ऑनलाईन वितरण प्रणालीची कळ दाबून प्रत्यक्ष शेतकऱ्यांना अर्थसहाय्य वितरणाची सुरुवात करण्यात आली. याद्वारे एका क्लिकवर सुमारे ४९ लाख ५० हजार हेक्टरी पाच हजार रुपये प्रमाणे दोन हेक्टर च्या मर्यादेत रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर २३९८ कोटी ९३ लक्ष रुपये रक्कम वर्ग करण्यात आली.**



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

२०२३ च्या खरीप हंगामात एकूण ९६ लाख ७८७ खातेदार शेतकरी हे सोयाबीन व कापूस उत्पादक होते. त्यानुसार त्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाच्या कृषी विभागाने एकूण ४१९४ कोटी रुपये इतका निधी डीबीटी प्रणालीवर उपलब्ध करून दिलेला आहे. त्यापैकी १५४८ कोटी ३४ लक्ष रुपये कापूस तर सोयाबीन साठी २६४६ कोटी ३४ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.अनुदान स्वतंत्रीत्या वितरण करण्यासाठी लेखाशीर्षासह महाआयटी द्वारे स्वतंत्र पोर्टल तयार करण्यात आले होते. त्यावर शेतकऱ्यांची स्वतःचे संमती पत्र व बँक खाते आधार इत्यादी माहिती जमा करून ती माहिती जुळणे आवश्यक असल्याने यामध्ये काही कालावधी लागला.आज जवळपास ४९ लाख ५० हजार शेतकऱ्यांना आपण याद्वारे लाभ दिला आहे. आधार व अन्य माहितीची जसजशी जुळणी होत राहील तसं तसे उर्वरित शेतकऱ्यांना देखील या योजनेचा लाभ दिला जाईल अशी माहिती राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.



# उमरखेड न.प.चे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकावर जाणून बुजून दुर्लक्ष

## नाम फलक लावण्याची मागणी





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरखेड | सय्यद रहीम राजा

येत्या काही दिवसात धम्म चक्र प्रवर्तन दिनानिमित्त उमरखेड शहरातील हजारों च्या संख्येने नागरिक महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी येतात. त्या पूर्वीच तेथील पुतळ्या समोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाची प्लेट काही कारणास्तव निघून पडली होती ही माहिती संबंधित कर्मचारी व अधिकारी यांना देण्यात आली होती पण मागील सहा महिन्यापासून ती नाम फलक बसविण्यात आले नाही.

मागील १ महिन्या पासून वारंवार सूचना, अर्ज, निवेदने करून सुद्धा नगर परिषद मुख्याधिकारी जाणून बुजून दुर्लक्ष करत आहेत. असे मत डॉ बाबासाहेब आंबेडकर वार्डातील तरुण तडफदार प्रफुल दिवेकर शहराध्यक्ष आझाद समाज पार्टी उमरखेड तसेच पत्रकार सिध्दार्थ दिवेकर शहराध्यक्ष भीम टायगर सेना उमरखेड यांनी व्यक्त केले.८ दिवसात नाम फलक न लावल्यास नगर परिषद प्रांगणात उपोषण तसेच तीव्र आंदोलन करू असा नगर परिषद मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे इशारा देण्यात आला आहे.

# अपंग असलेल्या व्यक्तींला सचिन दराडे यांनी दिला कृत्रिम पाय बसवून



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव | महादेव हरण

हिंगोली येथील रहिवासी असलेले समाजसेवक सचिन दराडे यांनी मकोडी येथील रहिवाशी असलेले नामदेव बिरगड या व्यक्तीला कुत्री पाय बसून मदत केल्याने नामदेव बिरगड हे स्वतःच्या पायावर चालू फिरू लागले आहेत, नामदेव बिरगड यांच्या पायाचा अपघात झाल्याने नामदेव बिरगड हे कोणतेही काम करत नव्हते समाजसेवक सचिन दराडे यांना फोन द्वारे विचारपूस केली असता सचिन दराडे यांनी स्वतःच्या खर्चाने नामदेव बिरगड यांना कृत्रिम पाय बसवून मोठी मदत केली व नामदेव बिरगड हे आज चालू फिरू लागले असून जिल्ह्यामधून समाजसेवक सचिन दराडे यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# कांताराम शिंदे गुरुजी यांचा व्हिडिओ निर्मितीमध्ये तालुक्यामध्ये प्रथम क्रमांक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

रांजणगाव | प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपरी दुमाला येथील तंत्रस्नेही शिक्षक कांताराम शिंदे यांनी सादर केलेल्या भाषा,गणित व सामाजिक शास्त्र या विषयांच्या व्हिडिओ निर्मीतीला शिरूर तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळाला आहे.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्या वतीने शिक्षकांसाठी आयोजित दर्जेदार व्हिडिओ निर्मिती स्पर्धा सन २०२३ आयोजित करण्यात आली होती. राज्यभरातील अनेक तंत्रस्नेही शिक्षकांनी यामध्ये सहभाग घेतला होता. शिरूर तालुक्यामधून देखील अनेक तंत्रस्नेही शिक्षकांनी यामध्ये सहभाग नोंदवला. त्यामध्ये पिंपरी दुमाला शाळेचे तंत्रस्नेही शिक्षक कांताराम शिंदे यांनी सादर केलेल्या इयत्ता पहिली दुसरी गट गणित, इयत्ता सहावी आठवी गट विषय भाषा, इयत्ता नववी दहावी गट विषय सामाजिक शास्त्र या विभागांमध्ये तालुक्यातून प्रथम क्रमांक व इयत्ता तिसरी ते पाचवी गट विषय गणित यांमध्ये तृतीय क्रमांक अशा एकूण चार स्पर्धेमध्ये तालुक्यातून सर्वोच्च यश मिळविले आहे.



त्यांच्या या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर,शिक्षण विस्तार अधिकारी किसन खोडदे,केंद्रप्रमुख यशवंत रणदिवे व मुख्याध्यापक राहुल चातुर यांनी अभिनंदन केले आहे.

कांताराम शिंदे यांना यापूर्वी पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने तंत्रस्नेही शिक्षक म्हणून जिल्हास्तरीय पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

या यशाबद्दल शिरूर तालुका ग्रांथालय संघाचे अध्यक्ष श्री.विवेकानंद फंड,सरपंच महेंद्र डोळस,उपसरपंच शरद खळदकर,शालेय समिती अध्यक्ष शशिकांत चिखले,उपाध्यक्ष वर्षा खळदकर यांनी कांताराम शिंदे यांचे कौतुक केले आहे.

# जातीजातींमध्ये तेढ निर्माण करणे योग्य नाही

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कोल्हापूर (वृत्तसंस्था)

भाजप आमदार नीतेश राणे यांच्या वादग्रस्त वक्तव्यावरून मंत्री उदय सामंत यांनी भाष्य केले आहे. अमरावतीतील अचलपूर पोलिस ठाण्यात नीतेश राणे यांच्यावर गुन्हा दाखल झाल्याप्रकरणी उदय सामंत यांनी प्रश्न विचारला असता, त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला की नाही, मला माहीत नाही. जाती जातींमध्ये तेढ निर्माण करणे योग्य नाही, असा सल्ला स्वामीजींना दिला आहे. हा सल्ला प्रत्येकाने तंतोतंत पाळला पाहिजे, अशी प्रतिक्रिया उदय सामंत यांनी दिली आहे. ते कोल्हापूर येथे माध्यमांशी बोलत होते.मंत्री उदय सामंत यांनी सोमवारी कोल्हापूर येथील कन्हेरी मठात महाराष्ट्रातील संत महंत, धर्माचार्य यांच्या 'संत समावेश' कार्यक्रमात उपस्थिती दर्शवली होती . कार्यक्रम झाल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

## चारोळी

**शोधित रहा नवी वाट**
**जरी येतील वळणाचे घाट**
**फ़िरवीत रहा सदविचाराने रहाट**
**नक्की उजडेल स्वप्नातील पहाट.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

# निवडणुक लढवणार आणि मताधिक्याने जिंकणार-चंद्रसेन पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार | धोंडीबा मुंडे

लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी,बहुजन समाजाला एकत्रित करण्यासाठी मी आगामी विधानसभेची निवडणुक शंभर टक्के लढवणार आणि मोठ्या मताधिक्याने जिंकणार असल्याचं वक्तव्य माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन पाटील यांनी केलं

रविवारी,२९ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता लिंबोटी फॉर्महाऊस येथे आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन पाटील यांनी बौद्ध व मातंग समाज बांधवांची संवाद बैठक आयोजित केली होती. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन पाटील म्हणाले की, लोकसभा निवडणुकीनंतर खऱ्या अर्थाने ओबीसी समाज एकवटला आहे. तसेच मोठ्या प्रमाणात जागृत झाला आहे. माझ्या पाठीमागे ओबीसी समाज खंबीरपणे उभा टाकला आहे. माळाकोळी ता.लोहा येथे मला वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड.प्रकाश आंबेडकर यांनी काढलेल्या ओबीसी आरक्षण बचाव यात्रेचे स्वागत करण्याचं भाग्य मिळालं. मी वंचित बहुजन आघाडी पक्षाचा सभासद झालो. पक्षाकडे अधिकृत उमेदवारी मागितली. परंतु मला काही जणांनी उमेदवारी मिळवू दिली नाही. लोहा-कंधार मतदारसंघात बौद्ध, मातंग आणि ओबीसी समाजाची ताकद मोठी आहे. जर हे



तिन्ही समाज एकत्रित आल्यास मोठी क्रांती घडणार आहे. आमदारकी व इतर स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात येणार आहेत. कोणत्याही परिस्थितीत मी आगामी लोहा विधानसभेची निवडणुक शंभर टक्के लढवणार आहे. मला आपल्या आशीर्वादाची गरज आहे. माझ्याकडे विजयाच गणित व विकासाच व्हिजन आहे. सर्वांनी मला साथ द्यावी. आयुष्यभर आपल्या ऋणात राहिल असे ते म्हणाले.

यावेळी लोहा कृउबा समितीचे संचालक केरबा केंद्रे, संचालक केशवराव तिडके, रिपब्लिकन सेनेचे अनिल गायकवाड, आंबुलगाचे सरपंच माधव मुसळे, दहिकळंबाचे सरपंच शंकरराव राक्षसे, माजी उपसरपंच अरुण सोनटक्के शाहीर बापुराव जमदाडे, शाहीर विलास ढवळे, डॉ.विश्वनाथ राठोड, कृष्णा केंद्रे, अनिल सुर्यवंशी, प्रेमानंद गायकवाड, सिध्दार्थ कांबळे, बबन जोंधळे, सचिन आढाव, विहान कदम, सुमेध पवार, सिध्दार्थ पवार, गोपीनाथ कांबळे, तुकाराम कांबळे, शिरसे सर, नवनाथ आढाव, गौतम सोनकांबळे आदींसह असंख्य बौद्ध व मातंग बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# अंदमान च्या बेटा वरून

लेखक : धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर



**अमरनाथ यात्री संघाचे अध्यक्ष धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांच्या सिद्धहस्त लेखन शैलीतून रोमांचकारी असणारा अंदमान टूर चा रोज चा वृत्तांत याच ठिकाणी दररोज प्रसिद्ध करण्यात येणार आहे. कृपया वाचकांनी प्रतिसाद द्यावा ही विनंती. – संपादक**

(भाग ६)

हॅवलॉक आयलँड बीच रिसॉर्टवर पहाटेच जाग आली ती निरनिराळ्या पक्षांच्या आवाजाने. रूमच्या बाहेर येऊन पाहिले तर आमच्या रिसॉर्टच्या कंपाउंड पर्यंत समुद्राचे पाणी आलेले होते.शांत वातावरणात समुद्राचे निरीक्षण करणे खूपच आल्हाददायक वाटत होते.अर्धा तास मॉर्निंग वॉक केला. त्यानंतर रिसॉर्ट मध्ये असलेल्या स्विमिंग पूल वर मनसोक्त पोहण्याचा आनंद लुटला.काल रिसॉर्ट मध्ये आल्यानंतर जे गोड नारळ पाणी आम्हाला वेलकम ड्रिंक म्हणून दिले होते त्याची आठवण झाली. वेटरला सांगून दोन नारळ पाणी पिले. सकाळी साडेआठ वाजता सर्वजण आपापल्या बॅगा घेऊन पुढील प्रवासासाठी तयार झाले होते. अमेरिकन ब्रेकफास्ट घेऊन आम्ही धक्क्यावर पोहोचलो. पुन्हा एकदा सर्व सोपस्कार पूर्ण करून क्रूज मधून आमचा परतीचा प्रवास सुरू झाला. ही क्रूज डायरेक्ट श्री विजयपूरम ला न जाता शहीद द्वीप मार्गे जाणार असल्यामुळे दोन तासापेक्षा जास्त वेळ समुद्र सफारीला लागला.

साडेबाराच्या सुमारास आम्ही श्री विजयपूरम ला पोहोचलो. आमचे सामान हॉटेल ला पोंहचविण्यासाठी छोट्या हत्तीची व्यवस्था करण्यात आली होती. आम्ही मात्र हॉटेलला जाण्यापूर्वी संग्रहालय पाहण्याचा निर्णय घेतला.पोर्ट ब्लेअरला अनेक संग्रहालये आहेत.यामधून समृद्ध इतिहास आणि संस्कृतीचे दर्शन घडत असल्यामुळे प्रत्येकाने भेट देणे आवश्यक आहे. ही संग्रहालये कलाकृती आणि कथांचे अमूल्य भांडार म्हणून काम करतात. बेटाच्या भूतकाळावर आणि स्थानिक परंपरांवर प्रकाश टाकतात. या प्रदेशातील समृद्ध सांस्कृतिकची सखोल माहिती देतात.या सर्वोत्कृष्ट संग्रहालयातून परस्परसंवादी प्रदर्शन आणि क्युरेट डिस्प्लेचा अभिमान दिसून येतो.ज्यामुळे या प्रदेशातील समृद्ध टेपेस्ट्रीबद्दल अभ्यागतांच्या ज्ञानात वाढ होते.

समुद्रिका या नौदल सागरी संग्रहालया आम्ही एकच्या दरम्यान पोहोचलो.आज रविवार असल्यामुळे बरीच गर्दी होती.सेल्युलर जेलच्या जवळच समुद्रिका नेव्हल मरीन आहे. भारतीय नौदलाद्वारे संचालित या अंदमान हॉटस्पॉटला मत्स्यसंग्रहालय देखील म्हटले जाते. इथे विविध प्रकारच्या प्रदर्शनांसाठी पाच खोल्या तयार केलेल्या आहेत.ज्यात वनस्पती, प्राणी, स्थानिक समुदायांची जीवनशैली आणि बेटांच्या सागरी परिसंस्थेबद्दल आकर्षक माहिती दिलेली आहे.इथे कलाकृतींचा विस्तृत संग्रह आहे.ज्यापैकी काही अत्यंत दुर्मिळ आहेत,जसे की शेल, माशांचे नमुने आणि कोरल. संग्रहालयाच्या लॉनवर निकोबार बेटावर मिळविलेल्या निळ्या व्हेलचा प्रचंड सांगाडा सर्वांनी कुतूहलाने पाहिले.हे संग्रहालय दररोज सकाळी ९ ते संध्याकाळी ५ पर्यंत खुले असते. सोमवारी संग्रहालयाला आठवडी सुट्टी असते. प्रौढांसाठी ५० तर विद्यार्थ्यांसाठी २५ प्रवेश शुल्क आहे. हे संग्रहालय पाहण्यासाठी एक तासाचा वेळ लागतो.


त्यानंतर आम्ही कार्बन कोव बीचवर असलेल्या पियरलेस रिसॉर्टवर पोहोचलो. विस्तीर्ण जागेत असलेले हे हॉटेल अनेक वर्षापासून पर्यटकांच्या सेवेत कार्यरत आहे. इमारत जुनी असली तरी सुस्थितीत आहे.आमच्यासाठी दुपारचे जेवण तयार असल्यामुळे सर्वांनी चविष्ट पदार्थांचा आस्वाद घेतला. रूममध्ये एक तास विश्रांती घेतली. आता आम्हाला जायचे होते मानववंशशास्त्रीय संग्रहालयपाहण्यासाठी. पोर्ट ब्लेअर अर्थात श्री विजयपूरम मधील सर्वोत्कृष्ट संग्रहालयांपैकी एक असलेले हे संग्रहालय. इथे आलेल्या प्रत्येक अभ्यागतांनी ते पाहणे चुकवू नये. हे पहात असताना अंदमान आणि निकोबार बेटांच्या मूळ लोकांबद्दलची जीवनशैली तसेच त्यांची संस्कृती पाहण्यास मिळाली. या एथनोग्राफिक संग्रहालयात निकोबार बेटावरील मंगोलॉइड,सेंटिनेलीज, जरावा, ओंगेस या आदिवासींच्या अंदमानी महान संस्कृतीचे दर्शन झाले. शॉम्पेनससह अंदमान बेटावरील चार नेग्रिटो लोकांची सविस्तर माहिती मिळाली. इथे दृकश्राव्य साठी असलेल्या विशेष खोलीत पंधरा मिनिटाच्या चित्रफितीतून मूळ जमातींची विशिष्ट संस्कृती, जीवनशैली आणि रीतिरिवाजांवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. हे मानववंशशास्त्रीय संग्रहालय १९७५ या वर्षी सुरू करण्यात आलेले होते. सध्या दोन मजली इमारती मध्ये आदिवासी वापरत असलेल्या विविध वस्तू, हत्यारे पाहताना आदिमकाळात जाऊन आल्यासारखे वाटले. आदिवासींचे नृत्य, धार्मिक श्रद्धा, संगीत आणि कला याची विस्तृत माहिती मिळाली. अंदमान आणि निकोबार बेटावरील जीवनपद्धतीबद्दल अधिक जाणून घेण्यास इच्छुक असलेल्या इतिहासप्रेमींसाठी एक लायब्ररी देखील इथे आहे. हे प्रदर्शन पाहण्यासाठी वीस रुपयाचे नाममात्र शुल्क आकारण्यात येते.

रिसॉर्टवर परत येताना काहींनी मार्केट मधून खरेदी केली. रात्रीच्या जेवणापूर्वी विद्या नोमूलवार यांचा वाढदिवस केक कापून साजरा केला. संदीप मैंद यांनी सर्वांना सूचना केली की, बारातांग पाहायला जाण्यासाठी रात्री तीन वाजता तयार राहणे आवश्यक आहे. त्यामुळे सक्तीने सर्वजण लवकरच झोपी गेले.(क्रमशः)

# जुन्या–नव्यांची मोठ बांधून समविचारी पक्षाला सोबत घेवून विधानसभा ताकदीने लढवणार –राजेभाऊ फड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोडे**



परळी विधानसभा निवडणुका दृष्टीक्षेपात आल्यात त्यातही राज्यात सर्वाधिक लक्षवेधी असलेली परळी विधानसभा मतदारसंघातील निवडणूक चुरशीची होण्याची चिन्हे आहेत. नुकताच शरद पवार यांच्या नेतृत्वात युवक नेते रासपाचे युवक प्रदेशचे अध्यक्ष राजेभाऊ फड यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. येणारी निवडणूक पक्षासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याने शरदचंद्र पवार यांच्या आदेशानुसार पक्षातील नव्या जुन्या नेत्यांची मोट बांधणार असून समविचारी पक्षांना आम्ही सोबत घेऊन विधानसभा निवडणूक ताकतीने लढणार असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना ही निवडणूक जड जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत. शरद पवारांच्या नेतृत्वाखाली अनेक इच्छुक चेहरे पक्षाकडे तिकिटाची मागणी करत आहेत. पक्षात येणाऱ्यांची दिवसेंदिवस संख्या वाढत आहे. इच्छुकांची संख्या कितीही जरी असली तरी पक्षादेश अंतिम मानून सर्वजण एकत्र येऊन ताकदीने विधानसभा निवडणूक लढणार असल्याचा निर्धार युवक नेते राजेभाऊ फड यांनी व्यक्त केला पक्षाची ताकद वाढवण्यासाठी सर्व समविचारी पक्षांना सोबत घेणार आहोत तसेच पक्षातील ज्येष्ठ किंवा नवीन चेहरा असे न मानता सर्व समान भावनेने एकत्र बसून ही निवडणूक ताकदीने लढणार आहोत असेही त्यांनी सांगितले. शेतकरी, शेतमजूर, महिला, विद्यार्थी तसेच नागरिकांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. या प्रश्नांची सोडवणूक मागील कित्येक वर्षांपासून झालेली नाही. विकासाच्या बाबतीत परळी मतदारसंघ अतिशय पिछाडीवर राहिलेला आहे. हा विकास साधून घेण्यासाठी महाविकास आघाडीच्या जनमतात मोठी वाढ होत आहे. विकासाची दृष्टी असलेले जेष्ठ नेते तसेच पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार हेच महाराष्ट्र राज्याचा सर्वांगीण विकास घडवून आणू शकतात असा विश्वास जनतेमध्ये निर्माण झालेला आहे. भारतीय जनता पार्टी आणि महाआघाडीच्या नेत्यांवर लोकांचा आता भरोसा राहिलेला नाही त्यांच्याकडून विकासाची अपेक्षा करता येत नाही म्हणून महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांना सोबत घेऊन आगामी विधानसभा निवडणूक आम्ही ताकदीने लढू, जनतेचे प्रश्न ऐरणीवर आणून त्याची सोडवणूक करू अशा भावना युवक नेते राजेभाऊ फड यांनी व्यक्त केल्या.

परळी मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध परळी विधानसभा मतदार संघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आपण कटिबध्द आहोत अशी ग्वाही देत ते म्हणाले की, येणाऱ्या काळात मतदारसंघ विकासाच्या बाबतीत महाराष्ट्रातील सर्वात आदर्श मतदारसंघ घडवण्याची आमची प्रामाणिक भावना आहे. आपला भाग सुजलाम् सुफलाम् झालेला आपल्याला बघायचं आहे. त्यासाठी समविचारी पक्षाच्या सर्वांना एकत्र घेऊन आगामी वाटचाल करणार असल्याचे राजेभाऊ फड म्हणाले.

# शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आयोजित शेतकरी संवाद यात्रेचा दुसरा दिवस

## विद्यार्थ्यांच्या प्रश्नासाठी युवानेते सुनील भैया गुट्टेंचा तात्काळ प्रशासनाला फोन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोडे**



परळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आयोजित ज्येष्ठ नेत्या सौ सुदामतीताई गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली व युवक नेते सुनील भैया गुटे यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या शेतकरी संवाद यात्रेच्या दुसऱ्या दिवशी या यात्रेला उदंड प्रतिसाद मिळाला दुसऱ्या दिवशीची यात्रा हसनाबाद औरंगपूर , तपोवन,वाका ,मोहा, करेवाडी, सरफराजपुर, आपटा तांडा, वंजारवाडी, गर्देवाडी, कावळ्याची वाडीतील शेतकऱ्यांशी संवाद साधला असुन मुक्काम बोधेगाव येथे ही यात्रा मुक्कामी थांबली आहे.दरम्यान ही संवाद यात्रा मोहा येथे गेली असता ज्येष्ठ स्वतंत्र सेनानी कॉम्रेड गंगाधर आप्पा बुरांडे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी कम्युनिस्ट नेते ड अजय बुरांडे यांनी यात्रेचे जोरदार स्वागत केले.यावेळी पंचायत समिती सदस्य कॉम्रेड सुदाम शिंदे यांच्यासह मोहा येथील आजी–माजी ग्रामपंचायत सरपंच ,सदस्य व शेतकरी बांधव उपस्थित होते. सरफराजपूर येथे पहिली ते पाचवी जिल्हा परिषद शाळा आहे परंतु त्या शाळेला बिल्डिंग नाही ही शाळा फक्त दहा बाय पंधराची एकच रूम आहे आणि त्या रूम मध्ये ७० विद्यार्थी शिक्षण घेत असुन ४ शिक्षक आहेत. याच्याबद्दल फेसबुक लाईव्ह द्वारे युवक नेते सुनील भैया गुटे यांनी प्रशासनाला तात्काळ याविषयी आवाहन करून हा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यासाठी विनंती केली आहे.या संवाद यात्रेच्या दुसऱ्या दिवशी अनेक ठिकाणी शेतामध्ये भेटी दिल्या आजच्या दुसऱ्या दिवशी जेष्ठ नेत्या सौ सुदामतीताई गुट्टे युवक नेते सुनील भैया गुटे शेतकरी नेते कालिदास दादा आपेट, तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज, विधानसभा अध्यक्ष किरण काका पवार ,कार्याध्यक्ष रमेश ढाकणे, उपाध्यक्ष महारुद्र कदम, संघटक बाबासाहेब गव्हाणे ,अंबाजोगाई तालुका संघटक दत्ताभाऊ शिंदे, युवक तालुका संघटक नंदकुमार दोडके, विद्यार्थी आघाडी तालुका अध्यक्ष पवन कुमार बोडके ,जेष्ठ नेते मुख्तार भाई यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जागावाटपाचा निर्णय दोन–चार दिवसांतच शक्य

# मविआच्या बैठकीआधीच खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केला विश्वास

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाविकास आघाडीतील जागावाटपाबाबत शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मोठा दावा केला आहे. येत्या तीन–चार दिवसांत परिस्थिती स्पष्ट होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याबाबत बैठकांची फेरी सुरू झाली असून घटक पक्षांचीही आजही बैठक सुरु असल्याचे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.या संदर्भात वृत्तसंस्थेशी बोलताना बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, जयंत पाटील यांनी कालच स्पष्ट केले आहे की, जागावाटपाबाबत चर्चा सुरू आहे. आम्ही यासंदर्भात नियमित बैठकाही घेत आहोत, आजही बैठक होत आहे. येत्या ३–४ दिवसांत याबाबत परिस्थिती अधिक स्पष्ट होईल.'दुसरीकडे, शरद पवार यांनी रविवारी सांगितले होते की, महाविकास आघाडी येत्या ८–१० दिवसांत महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसंदर्भात जागावाटपाची चर्चा पूर्ण करेल. पक्ष सोडणाऱ्या नेत्यांवर निशाणा साधत शरद पवार म्हणाले होते की, त्यांच्यापैकी काहींना निवडणूक जिंकता येणार नाही.शरद पवार यांनी त्यांच्या पक्षात कोणाला तिकीट दिले जाणार हे देखील सांगितले होते. त्या जोरावर ज्या नेत्यांच्या विजयाची शक्यता आहे, त्यांना तिकीट मिळेल, असे शरद पवार म्हणाले होते.

# उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या जनसंमान यात्रेचे वादळ आज परळीत धडकणार

## अजितदादा पवार,सुनील तटकरे,कु.अदितीताई तटकरे,धनंजय मुंडे यांसह अनेक मान्यवर राहणार उपस्थित

## लाडक्या बहिणींच्या वतीने परळीत दादांचे होणार जंगी स्वागत व मिरवणूक






■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोडे**

लाभ आणि बळ' हे ब्रीद महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींसाठी घेऊन जनसन्मान यात्रेच्या निमित्ताने सबंध महाराष्ट्रात फिरत असलेले राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्या जनसन्मान यात्रेचे वादळ आज मंगळवार, दि.०१ ऑक्टोबर रोजी बीड जिल्ह्याच्या परळी शहरात धडकणार आहे. लाडक्या बहिणींच्या सशक्तिकरणाच्या दृष्टीने तसेच परळी मतदारसंघासह बीड जिल्ह्यातील लाडक्या बहिणींशी व नागरिकांशी संवाद साधण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष ना.अजितदादा पवार यांसह प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे, महिला व बालविकास मंत्री कु.आदीतीताई तटकरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ.रुपालीताई चाकणकर, आ.प्रकाशदादा सोळंके, आ.बाळासाहेब आजबे काका, मा.आ.अमरसिंह भैय्या पंडित, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना परली विधानसभा अशासकीय समितीचे अध्यक्ष वाल्मिक अण्णा कराड, राष्ट्रवादी काँग्रेसचे परळी विधानसभा अध्यक्ष गोविंदराव देशमुख, त्याचबरोबर युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण, युवती आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष संध्याताई सोनवणे, विद्यार्थी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम यांसह आदी मान्यवर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. लाडक्या बहिणींचा हा मेळावा परळी वैद्यनाथ शहरातील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या समोरील मैदानात दुपारी ३ वाजता संपन्न होणार असून, तत्पूर्वी दुपारी दीड वाजल्यापासून छत्रपती संभाजी महाराज चौक (इटके कॉर्नर) येथून दादांची भव्य स्वागत मिरवून निघणार आहे. ही मिरवणूक तीन वाजता मुख्य कार्यक्रम स्थळी पोचून ३ वाजता मेळाव्यास सुरुवात होईल.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या लाडक्या बहिणींना लाभ आणि बळ देण्याच्या या भव्य जनसन्मान यात्रेत परळी मतदारसंघासह बीड जिल्ह्यातील महिला भगिनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.दरम्यान मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेच्या दोन हप्त्यांच्या रकमेतून स्वतःचा व्यवसाय सुरू करून एक आठवड्यात १२,००० रुपयांचा नफा मिळवणाऱ्या सौ.अक्षराताई अक्षय शिंदे या ताईंचा अजितदादा व मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे. त्याचबरोबर योजनेतील पात्र ठरलेल्या महिलांना प्राथमिक स्वरूपात प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत.

# स्वामी चिंचोली येथील कोविड सेंटरचा चौकशी अहवाल देण्यास आरोग्य अधिकारी यांची टाळाटाळ का ?

## बेड चोरी प्रकरण;स्वयंभू बड्या नेत्यांना भोवणार !



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

स्वामी चिंचोली ता.दौंड येथे कोविडच्या कार्यकाळात येथील कोविडचे सेंटरमध्ये पुणे येथील एका व्यक्तीने शंभर बेड सेंटर स्वामी चिंचोली येथे दिले होते.तसेच ग्रामपंचायत स्वामी चिंचोली यांनी एक ते दीड लाख रुपये पर्यंतचे साहित्य फ्रीज वगैरे याच कोविड सेंटरला दिले होते.अशी चर्चा आहे.

तरी सदर ठिकाणी समक्ष पाहणी केली असता या ठिकाणी कुठलेही बेड व इतर साहित्य दिसून येत नाही. तरी या ठिकाणचे बेड चोरीला गेलेले आहेत. संबंधित कोविड सेंटर वरती कोणते अधिकारी, कर्मचारी ड्युटीवर कार्यरत होते.त्यांनी कागदपत्रे अद्यावत का ठेवले नाहीत,त्यांनी स्टॉक रजिस्टरला नोंद का केली नाही,साहित्य चोरीला कसे गेले, त्यांनी कामात हलगर्जपणा व कर्तव्यात कसूर केला असल्याने त्यांच्यावरती कायदेशीर कारवाई करून संबंधित बेडची व इतर साहित्यांची फिर्याद पोलीस स्टेशनला का दिली नाही.

असे अनेक प्रश्न उपस्थीत होत आहेत. स्वामीचिंचोली येथील ग्रामस्थांमधे प्रचंड नाराजी पाहायला मिळत आहे.त्यामुळे संबंधित बेड व साहित्य चोरी गेलेली फिर्याद तात्काळ दौंड पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात यावी. संबंधित चोरीला गेलेल्या संपूर्ण साहित्याची चौकशी करून सदरचा मुद्देमाल हस्तगत करावा.अन्यथा आम्ही शिवसेना स्टाईलने उग्र आंदोलन करू असे रमेश पवळ यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

**“ स्वामी चिंचोली येथील कोविड सेंटर मधील बेड व इतर साहित्य चोरीला गेलेल्या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी यांना तहसीलदार दौंड आणि गटविकास अधिकारी पंचायत समिती दौंड यांनी दिनांक.१४/०३/२०२४ रोजी लेखी आदेश दिले असून ७ दिवसांत चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी असे लेखी कळविले होते परंतु या महाशयांनी दोन्ही अधिकारी यांच्या आदेशाला तालुका आरोग्य अधिकारी दौंड यांनी केराची टोपली दाखवली आहे.कारण आदेश देऊन सहा महिने झाले तरी चौकशी चालूच आहे.**

# मराठ्यांनो आता एकच पर्याय राज्य सरकारचा राजकीय सुपडा साफ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मा.मनोज जरांगे पाटील यांनी सांगितलं होतं आरक्षण दिलं तर सरकारला पुन्हा सत्तेत बसवू डोक्यावर घेऊ पण राज्य सरकार त्या लायकीचे राहिले नाही गेली दिड वर्षांपासून मराठ्यांना आरक्षणच आश्वासन देऊन झुलवत ठेवलं,आपण मागील दीड वर्षांपासून संघर्ष करत संयम राखला मा.जरांगे पटलांसाय एका हाकेला लाखो अनेक सभांच्या मार्फत जमा झालो, इतकंच काय तर एका हाकेला मुबंईत कोटीच्या संख्येने जमा झालोत तिथंही राज्य सरकारने छत्रपती शिवाजी महाराजांनी खोटी शपथ घेतली आणि राजपत्र हातात देऊन फसवणूक केली

हैदराबाद,सातारा,बॉम्बे ग्याझेट लागू करू अहवाल अंतिम टप्यात आहे ३० सप्टेंबर प्रयन्त लागू करू म्हणून झुलवत ठेवलं आपण राज्य सरकारवर आशावादी होतोत




मागील लोकसभेच्या निकालावरून राज्य सरकारने कुठलाच धडा घेतलेला दिसत नाही .आणि आजच्या समितीच्या बैठकीत मराठा आरक्षण देता येणार नाही,आणि मराठ्यांचा कुणबीकरण करता येणार नाही म्हणून समितीचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी स्पष्टच सांगितलं आणि मराठ्यांच्या राज्य सरकारवरील असलेल्या आशा खऱ्या अर्थाने आज संपल्या.

आश्वासन देऊन झुलवत ठेवणाऱ्या मराठ्यांच्या मतांची किंमत नसणाऱ्या राज्य सरकारला आता धडा शिकविण्याची वेळ आली मराठा समाज अनेक वर्षांपासून भाजपच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला पण जेव्हा मराठ्यांना आरक्षणाची खरी गरज होती तेव्हा भाजपने पळ काढला भाजपला वेळ होती आता भाजपच्या आणि नेत्यांच्या चेल्यानी आता राजकीय ज्ञान पाजू नये याला फायदा झाला आणि त्याला फायदा झाला तुम्ही नालायक निघालात तुम्हाला मराठ्यांच्या मतांची किंमत राहिली नाही तुम्ही जर आरक्षण दिलं असतं तर तुम्हाला हेच मराठे सत्तेत बसवले असते पण आता नाही म्हणून आता आपल्यापुढे एकच पर्याय आहे फक्त सुपडा साफ.

# इंदापूर मध्ये गोळीबार;एक तरुण गंभीर जखमी पोलिसांनी आरोपीला दोन तासात घेतलं ताब्यात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

इंदापूर शहरात आय कॉलेज समोर एका व्यक्तीवर गोळीबार करण्यात आला होता. त्यात तो गंभीर जखमी झाला आहे.इंदापूर गोळीबार प्रकरणातील आरोपीला पोलिसांनी दोन तासातचं वालचंदनगर येथून ताब्यात घेतल आहे.या घटनेनंतर इंदापूर तालुक्यासह आजूबाजूच्या तालुक्यात आणि जिल्ह्यात जागोजागी नाकाबंदी करण्यात आली होती.याचवेळी वालचंदनगर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी नाकाबंदी दरम्यान आरोपीला ताब्यात घेतले.इंदापूर आणि वालचंदनगर पोलिसांनी मिळून संयुक्तिकरित्या ही कारवाई केली.

धिरज ऊर्फ सोन्या हनुमंत चोरमले हा आरोपी असून तो शिरसोडी मधील असून जुन्या भांडणाच्या कारणातून हा गोळीबार करण्यात आल्याची माहिती अपर पोलिस अधिक्षक गणेश बिरादार यांनी दिली असून आरोपी



कडून पोलिसांनी एक पिस्तूल ही ताब्यात घेतले आहे.

इंदापूर शहरातील आय कॉलेजसमोर सोमवारी दि.३० सप्टेंबर रोजी सायंकाळी सात च्या सुमारास ही गोळीबाराची घटना घडली होती.यात राहुल अशोक चव्हाण हा जखमी झाला आहे.

बारामती मधील घटना ताजी असताना पुण्याच्या इंदापुरामध्ये तरुणावर गोळीबार झाल्याने खळबळ उडाली होती.या नंतर पोलिसांनी दौंड,यवत, वालचंदनगर,सोलापूर,ग्रामीण शहर,धाराशिव भागात नाकाबंदी केली होती.

या घटनेनंतर अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार आणि बारामतीचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड,इंदापूर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक सुर्यकांत कोकणे यांनी तात्काळ घटनास्थळाला भेट देत संपूर्ण प्रकरणाचा तपास वेगाने सुरू केला.जखमी तरुणावर इंदापूर शहरातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून पोलिसांनी त्या जखमी तरुणाची देखील भेट घेतली आहे.दोनच तासात इंदापूर आणि वालचंदनगर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर त्यांच्या कामगिरीमुळे पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत नेहरू शाळेचा हमजा शेख प्रथम तर वसुंधराची ऋतुजा लटपटे द्वितीय तर गणेशचा आदित्य वांढरे तृतीय

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

मराठा सेवा संघाच्या वतीने महात्मा गांधी विद्यालय आष्टी येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी आंतरशाले वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये एकूण पंधरा शाळा मधील ३० स्पर्धकांनी भाग घेतला होता.

या स्पर्धेत पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयाचा हमजा नदीम शेख याने महामानव छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर अप्रतिम असे भाषण केले. व २००१ चे प्रथम पारितोषिक पटकावले.वसुंधरा माध्यमिक शाळेची ऋतुजा पांडुरंग लटपटे हिने शेतकऱ्यांचे जीवन हुबेहूब श्रोत्यासमोर उभे केले. आणि १५०१ चे द्वितीय द्वितीय पारितोषिक प्राप्त केले.गणेश विद्यालयाचा आदित्य अण्णासाहेब वांढरे यानेही शेतकऱ्याचे जीवन चरित्र रेखाटून १००१चे तृतीय पारितोषिक मिळवले.



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मांडवा येथील प्रतीक्षा शरद पवार आणि वसुंधरा शाळेची अंकिता काकासाहेब पोकळे यांनी प्रत्येकी रुपये ५०१ चे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले.

शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून मराठा सेवा संघाच्या वतीने या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस मराठा सेवा संघाचे लक्ष्मण रेडेकर व महात्मा गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक जावेद पठाण सर यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून स्पर्धेचे उद्घाटन झाले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून मुकुंद लगड सर,बाळासाहेब तळेकर सर,सारुक् सर,राजेंद्र लाड सर,वाल्हेकर सर यांनी काम पाहिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री लक्ष्मण रेडेकर सर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून इंजि. तानाजी जंजिरे हे उपस्थित होते.त्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजक ऍड सिताराम पोकळे जेष्ठ पत्रकार यांनी केले.स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संतोष सायकड सर,हनुमंत बन्सी पोकळे सर, वाहेद सर व शाळेचा शिक्षक वृंद आणि मराठा सेवा संघाचे कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले. शेवटी ऍड सीताराम पोकळे, संयोजक यांनी संस्थाप्रमुख नियमतुल्ला बेग यांच्यासह सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# कायदा सुव्यवस्था बिघडविणाऱ्यांची गय केली जाणार नाही:पोलीस निरीक्षक गोपाल पवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

दौंड पोलीस स्टेशन च्या पोलीस निरीक्षक पदी गोपाल पवार यांची नियुक्ती झाल्याने लागलीच दौंड तालुक्यातील पत्रकार यांचा परिचय करून घेतला तसेच अनेक विषयावर चर्चा करण्यात आली, यामध्ये अवैध धंदे,रोड रोमिओ,कर्कश आवाजात टू व्हीलर चालवणाऱ्या कारवाई करणे, महिलांना छेडछाड करणाऱ्या त्यांच्यावर कारवाई करणे,शाळेच्या परिसरामध्ये टुकार मुलांचा बंदोबस्त करणे,गोपाळवाडी रोडवरील वाहतुकीचा विषय हाताळणे,एमआयडीसी कडून येणाऱ्या बसेस मुळे वाहतुकीला होणारा परिणाम,कंपनीच्या बसेस वर असणाऱ्या ड्रायव्हरची चारित्र पडताळणी करणे, तसेच गोपाळवाडी रोड वरील सरपंच वस्ती या ठिकाणी असलेल्या बंद पडलेली पोलीस चौकी चालू करणे, रोज सकाळी भंगार गोळा करणाऱ्या



गाड्या कर्कश साऊंड लावून व्यवसाय करतात त्यांच्यावर कारवाई करणे, बाबत आधी विषयावर चर्चा होऊन यासाठी योग्य तो निर्णय घेतला जाईल, तसेच सामाजिक सलोखा राखण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, गुंड प्रवृत्तीच्या लोकांना त्यांच्याच भाषेत त्यांना धडा शिकवला जाईल,आणि कायदा सुव्यवस्था बिघडवणाऱ्यांची अजिबात गय केली जाणार नाही.असे पवार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# बालाजी मंगल कार्यालय या ठिकाणी मोठ्या उत्साहात सत्ता परिवर्तन निर्धन मेळावा पार पडला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

. त्यावेळी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. दिपकभाऊ निकाळजे हे मेळाव्याचे अध्यक्षस्थानी होते तसेच या मेळाव्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून काँग्रेस नेते मा.श्री.घनःशाम आण्णा शेलार व माजी जि.प.सदस्य मा.श्री. अनिल ठवाल, मुकुंद सोनटक्के, रावसाहेब हरिभाऊ पोडके, कांतीलाल कोकाटे, निशांत लोखंडे व इतर पदाधिकारी तसेच रिपब्लिक पार्टी ऑफ इंडिया (–) चे महाराष्ट्र संपर्क प्रमुख मा. संतोषबापु गलांडे, महाराष्ट्र सचिव मा. अशोकजी ससाणे, केंद्रीय कार्यालय प्रमुख मा.तानाजी मिसळे, महाराष्ट्र संघटक मा. कैलासजी जोगदंड, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष मा.शशिकांत दारोळे, पुणे जिल्हा अध्यक्ष मा. सचिनभाऊ खरात, जिल्हा संपर्क प्रमुख मा.रोहित आव्हाड, युवा जिल्हा संपर्क प्रमुख मा.विलास कांबळे, अहमदनगर जिल्हा अध्यक्ष उत्तर मा. अमोन शिंदे तसेच प्रदीप मकासरे, रॉकी लोंढे, हरिष आल्हाट, दिनेश पंडित, जॉन पाटोळे, संदिप वाघमारे, दादा घोडके, परशुराम घोडके, भगवान गजरमल, युवराज शिंदे, युवराज शिंदे, राहुल छत्तीसे, करण चव्हाण, अजित भोसले, कमलाकर आल्हाट, अक्षय लगाडे, वैभव रणसिंग, विवेक घोडके आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने

यावेळी मेळाव्याचे अध्यक्ष व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय दीपक भाऊ निकाळजे आपल्या भाषणात बोलत असताना त्यांनी सांगितले की येत्या काळात अहमदनगर जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण देशात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (–) हा पक्ष मोठ्या प्रमाणात संघटन निर्माण करत असून पुढील राजकीय घडामोडीत भरीव कामगिरी करणार असून नेहमीच संविधान वाचवणे तसेच अन्याय




अत्याचाराच्या विरोधात बाहीर भूमीका घेऊन गरीब, आदिवासी, दिनदुबळ्या, अन्यायग्रस्त घटकांना न्याय मिळवून देण्याचे काम पक्षामार्फत करणार असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले तसेच येत्या काळात अ.नगर दक्षिणचे जिल्हाध्यक्ष मा. निलेशभाऊ गायकवाड यांच्या हातून पक्ष हिताचे व समाजहिताचे कार्य घडेल असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त करून पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या...

तसेच मेळाव्याचे प्रमुख पाहुणे मा.श्री. पनशाम आण्णा शेलार यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, आजपर्यंतच्या राजकीय क्षेत्रात आंबेडकरी समुदायाचा खूप मोठा वाटा राहिलेला आहे आणि मेळाव्याच्या नावाप्रमाणेच नक्कीच येत्या काळात सत्ता परिवर्तनातही रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (–) व सर्वच आंबेडकरी विचारधारेतील समूहांचा मोठा वाटा असणार आहे हे नमूद केले.

या मेळाव्याला मोलाची साथ लाभलेले मा. सचिनजी घोडके, मा. नानासाहेब सांगळे, मा. नितीनजी जावळे या मान्यवरांचा मा. दिपकभाऊ निकाळजे यांच्या हातून सत्कार करण्यात आला. आणि या कार्यक्रमाचे आयोजक अ.नगर दक्षिण जिल्हाध्यक्ष मा.निलेशभाऊ गायकवाड हे होते.

# उमरखेड शहरात ईद-ए-मिलादुन्नबी मिरवणूक शांततेत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरखेड । सय्यद रहीम रजा

ईद -ए - मिलादुन्नबी निमित्त आज शहरातून काढलेली मिरवणूक सिरत कमीटीच्या पुढाकाराने काढुन शांततेत समारोप केला आहे. सदरील मिरवणूक दि २८ रोजी काढण्याची पोलिस प्रशासनाने विनंती केली होती त्या विनंतीस सकारात्मक प्रतिसाद देत दिनांक १९ सप्टेंबरला गणेश उत्सव मिरवणूक असल्याने येथील मुस्लीम समाज बांधव व सिरत कमिटीने पुढाकार घेत १९ तारखेची मिरवणूक आज दि. २८ रोजी मोहम्मद पैगंबर यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमासह सकाळी ९ पासून येथील तातारशाह बाबा दर्गा येथुन भव्य मिरवणूक डीजे लावून काढण्यात आली.

यावेळी मिरवणुकीच्या प्रारंभी सिरत कमिटीचे अध्यक्ष अब्दुल समद यांनी युवकांना मार्गदर्शन करून मिरवणुकीला सुरुवात केली. यावेळी इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या स्मृतिपित्यर्थ काही वचने म्हणण्यात आली.जुलूसे ए मोहम्मद सकाळी ९ वाजता स्थानिक तातारशहा बाबा दर्गा येथून मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली तेथून मुख्य



मार्गाने मार्गक्रम करीत दुपारी चार वाजता स्थानिक गांधी चौक मध्ये मिरवणुकीची सांगता झाली.प्रेषित मोहम्मद पैगंबर यांनी जगाला दिलेली शांती आणि मानवतेची शिकवण समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचावी यामागील उद्देश असल्याचे काही मुस्लिम बांधवांकडून सांगण्यात आले.

यावेळी शहरातील मुस्लिम बहुल वस्त्यांमध्ये आकर्षक विद्युत रोषणाई, पताके, झेंडे लावून सजावट करण्यात आली होती, मिरवणुकीमध्ये सहभागी झालेल्यांसाठी सामाजिक संघटना कार्यकर्त्यांकडून शरबत व अल्पउपहार, पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.शहरातून निघालेल्या मिरवणुकीत विविध ठिकाणांहून निघालेल्या रॅली मध्ये शेकडोच्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते.शहरात कुठल्याही प्रकारचे अनुचित घटना घडू नये म्हणून कालपासून अतिरिक्त पोलीस अधीक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड, ठाणेदार संजय साळुंखे सह जिल्ह्यातील पाचशेच्या वर पोलीस कर्मचाऱ्यांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.


> ’ “ आज उमरखेड शहराला ’भाईचारा या वाक्याची गरज असल्याने आम्ही पोलिस प्रशासनाची विनंती मान्य केली. याला आजच्या मिरवणूकीत विशेष करून हिंदु बांधवांनी, पोलिस प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी तसेच माझ्या मुस्लिम बांधवांनी सहकार्य करून उमरखेडात भाईचारा हमेशा राहिल याचे उदाहरण निर्माण केल्याने मी सर्वाचा आभारी आहो
> – अ.समद पठाण
> सिरत कमिटी अध्यक्ष , उमरखेड

# भोपाळवाडी येथे तथागत गौतम बुद्ध मुर्तीच्या पंधराव्या वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या मुर्तीच्या पंधराव्या वर्धापन दिनानिमित्त शांतीदूत बुद्ध विहार सिध्दार्थ नगर भोपाळवाडी , कलंबर बु. ता.लोहा जि.नांदेड येथे दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी शुक्रवारी मंगलमय वातावरणात वर्धापनदिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ :३५ वाजता पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण रावसाहेब पाटील भोपाळे ( मा. सरपंच कलंबर बु.) यांच्या शुभहस्ते होणार आहे. तर कार्यक्रमाचे उध्दघाटक म्हणून नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय माजी खासदार तथा लोकनेते प्रतापराव पाटील चिखलीकर , यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती मा.पांचाळ मॅडम ( ग्रामसेविका ) , मा. नरेंद्र गायकवाड ( उपसभापती पं.स.लोहा ) , बाबुराव गोरे ( म. गां. तं. मु. अध्यक्ष कलंबर ) , महेश करंडे ( पो.पा. भोपाळवाडी ) , प्रमुख पाहुणे म्हणून शिवाभाऊ नरंगले ( वंचित बहुजन आ. जिल्हाध्यक्ष नांदेड ) , बालाजी परदेशी ( मा. जि.प. सदस्य ) , डि.के. कांबळे ( सामाजिक कार्यकर्ते ) , संतोष पाटील गवारे. ( वं. ब. आ. ता.अध्यक्ष लोहा ) , दत्ता कांबळे ( पत्रकार तरूण भारत) , मारोती करंडे ( मा.सरपंच ) , विठ्ठल ताटे पाटील ( पत्रकार) , दिलीप पाटील भोपाळे ( ग्रा.पं. सदस्य कलंबर ) , विठ्ठल कांबळे ( ग्रा.पं. सदस्य) , मारोतीराव पाटील घोरबांड ( संस्थाचालक समाज उन्नती शिक्षण संस्था कलंबर ) , राहुलदादा राके. ( सामाजिक कार्यकर्त्या) , मारोती कोठेवाड , जिवन पाटील भोपाळे , श्री पाटील ताटे ( छावा तालुकाध्यक्ष लोहा ) , बाळु पाटील भोकरे , यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. दुपारी १ वाजता गावातील प्रमुख रस्त्याने तथागत भगवान गौतम बुद्ध व बोध्दीसत्व भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राची भव्य मिरवणूक निघणार आहे. रात्रीला सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक माधव वाढवे ( हादगाव ) व महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध गायिका कु. नालंदा सांगवीकर ( नांदेड ) यांच्या भीम गीताचा. दणदणीत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे . तरी परिसरातील भीमसैनिक समाजबांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन नामदेव कांबळे , देविदास वाघमारे , राहुल गायकवाड , गंगाधर हानवंते , यांनी केले आहे.



# मानधनापासुन वंचीत असणाऱ्या अपंग व्यक्तींचे मानधन तात्काळ देण्यात यावे,नसता अंपग आक्रोश मोर्चा काढणार

## न.प.च्या मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मांगणी-स्वराज्य संघटना जिल्हाध्यक्ष जाधव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

दानापूर । राम शिंदे

शासनाकडुन अपंग व्यक्तींसाठी अर्थसाहाय्य देण्याची तरतुद करण्यात आलेली असुन शासनाकडुन ५% अनुदान अपंगाना देण्यात येत असते मात्र शहरातील काही अपंग व्यक्तींना २ वर्षापासुन हे अनुदान मिळाले नसुन दोन वर्षापासुन अपंग व्यक्ती मदतीच्या प्रतिक्षेत आहे.

या संबंधीत अपंग व्यक्तींची हेडसाळ होत असुन त्यांना संबंधीत अनुदानासाठी नगरपरिषद कार्यालयात वारंवार चकरा माराव्या लागत असुन संबधीत कार्यालयामार्फत वेळोवेळी त्यांना टोलवाटोलवीची उत्तरे देऊन संबधीत अधिकारी कुठलाही प्रतिसाद देत नसल्याचे निर्देशनात आले असुन या अपंग व्यक्तींच्या




मदतीसाठी स्वराज्य संघटनेचे जिल्हा अध्यक्ष विकास जाधव यांनी पुढाकार घेऊन या अपंग व्यक्तींना सोबत घेऊन मुख्याधिकार्यांची भेट घेत अपंग व्यक्तींना अनुदान वाटप का होत नाही याचा जाब विचारून धारेवर धरले.यावेळी त्यांना निवेदन देऊन जर अपंग व्यक्तींचे मानधन खात्यात लवकरात लवकर वर्ग करण्याचा निर्णय घेतला नाही तर अपंगाचा आक्रोश मोर्चा नगरपरिषद कार्यालवर काढण्यात येईल असा इशारा देण्यात आला.निवेदनावर स्वराज्य संघटनेचे जिल्हाअध्यक्ष विकास जाधव, मानधनापासुन वंचीत अपंग व्यक्ती किसन दसपुते,हरून शेख,जावेद पठाण,संजय परदेशी,राहूल पगारे,जफर शेख नजीर,रफिक खान,सलीम अहमद आदींच्या स्वाक्षर्या आहेत.

# दिपभारती विद्यालय दानापूरचे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

दानापूर । राम शिंदे

सम्राट अशोक शिक्षण संस्था भोकरदन संचलित दिपभारती मा.व उच्च माध्यमिक विद्यालय दानापुर ता. भोकरदन जि. जालना च्या विद्यार्थिनींने कु. पवित्रा संजीव दांडगे (१७ वर्ष आतील गटात) बांबू उडी तसेच सुहानी सुनील दांडगे (१९ वर्ष आतील गटात) बांबू उडी प्रथम क्रमांक पटकावला व सुहानी सुनील दांडगे हातोडा फेक तालुका क्रीडा स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला व जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी पात्र ठरल्या आहेत त्याबद्दल त्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. सुदामरावजी सदाशिवे, सचिव मा. दिपकभैय्या सदाशिवे व विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. वाय.एस गवळी यांनी अभिनंदन केले.

## वंचित बहुजन आघाडी लोणार तालुक्याचे वतीने

# वंचित मेहकर-लोणार विधानसभा नेते नागवंशी संघपाल पनाड यांच्या नेतृत्वामध्ये,आरक्षण बचाव यात्रा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोणार । विनायक कुटे

वंचित बहुजन आघाडी लोणार तालुक्याच्या वतीने मेहकर -लोणार विधानसभा नेते नागवंशी संघपाल पनाड यांच्या नेतृत्वाखाली व वंचित चे श्रद्धेय,बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशान्वये,प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर, समन्वय समितीचे उपाध्यक्ष अशोक भाऊ सोनोने, प्रदेश उपाध्यक्ष तथा प्रभारी धैर्यवर्धन पुंडकर साहेब, परदेश उपाध्यक्ष सविता ताई मुंडे, जिल्हाध्यक्ष निलेश भाऊ जाधव, महासचिव प्रशांत भाऊ वाघोदे, विष्णू भाऊ उबाळे, माजी जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. के.बी. इंगळे, यांच्या मार्गदर्शनाखाली. तालुका महासचिव बळीभाऊ मोरे, युवा




जिल्हा सचिव आदित्य भाऊ घेवंदे, ज्येष्ठ नेते सुभाष भाई मोरे,शहराध्यक्ष दीपक भाऊ अंभोरे, युवा शहराध्यक्ष महेंद्र मोरे, तालुका उपाध्यक्ष अनिल भाऊ पवार, तालुका उपाध्यक्ष भास्कर मोरे, यांच्या उपस्थितीमध्ये सुलतानपूर ते बोरखेडी, वेणी, गुंधा ,हिरडव ,गायखेड, पळसखेड मार्गे लोणार येथे पोचून हिरडव चौक ते बस स्थानक चौकामध्ये मान्यवरांनी ओबीसी आरक्ष,ण स्कॉलरशिप, पदोन्नती आरक्षण, या विषयावर हात घालून. ओबीसी बांधवांच्या आरक्षणाला हात न लावता गरीब मराठ्यांना वेगळे आरक्षण द्यावे यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले. मतदार संघातील विविध रखडलेल्या कामाच्या संदर्भात जनजागृती केली व ओबीसी बांधवांना आव्हान केले.की श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांचे उमेदवाराला विधानसभेमध्ये पाठवावे जेणेकरून आरक्षण टिकेल. विधानसभेमध्ये बहुजन बांधवांचा आवाज त्या ठिकाणी उठवतील. त्यासाठी श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकराचे हात मजबूत करून आपल्या समस्या जाणणारा प्रतिनिधी विधानसभेत पाठवावा. यावेळी तालुक्यातून श्रीराम पनाड,दादाराव पनाड, किरण पनाड , राजहंस जावळे, सुबोध घेवंदे,महेंद्र मधुकर पनाड ,मंगेश पनाड ,महेश मोरे, मनोहर पनाड , प्रसेंजीत पनाड,शिवाजी खोलगडे, संजय शेजुळ,कळनू,रतन कटारे, जावळे,ग्रा.प.सदस्या सुमनबाई पनाड, कमलबाई शेजुळ, रुक्मिणीबाई पन्हाळा घेऊन दे हरणाबाई चव्हाण, खरात बाई, शिराळे बाई, अवचार बाई,शेकडो महिला व पुरुष उपस्थित होते.

# टाकळी कडेवळीत सहकारी सोसायटी वार्षिक सर्व साधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले

टाकळी कडेवळीत सहकारी सोसायटीची ६४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २९।९।२०२४रोजी संस्थेचे चेअरमन श्री. नितिन माणिकराव वाळुंज यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली यावेळी विषय वाचन सचिव सुरेश दिवटे भाऊसाहेब यांनी केले. त्यानंतर सर्व विषय मंजुर करण्यात आले.काही सभासदांनी कामकाजावर काही सुचना केल्या त्यामध्ये अरूणराव इथापे, भानुदास खामकर, सुदाम खामकर,डॉ.सुभाष देशमुख, सुदामराव नवले, बाळासाहेब




घोलप, बापुसाहेब वाळुंज, बाबासाहेब इथापे, अदिंनी काही सुचना मांडल्या तर सर्व सुचनांचे समाधानकारक उत्तर संचालक अशोक बापुराव नवले यांनी दिली त्यात सभासद सरकारी कर्ज माफी होनार यामुळे सभासद कर्ज भरत नाही त्यामुळे संस्था नफा वाटप करु शकत नाही आसे सांगीतले. या वेळी चेअरमन, व्हा चेअरमन महेश भिसे,सर्व संचालक बाबासाहेब इथापे विठ्ठलराव वाळुंज , बापुसाहेब वाळुंज, फक्कड वाळुंज,विशनुपंथ इथापे अतुल नवले, अंकुशदादा नवले, अरूणराव नवले, भगवान खामकर, धर्मराज वाळुंज, पुनमचंद वाळुंज सेल्समन, हेमंत सुपेकर, राजेंद्र सुपेकर अशोक सोनवणे, सुभाष वाळुंज, विक्रम वाळुंज,कल्याण वाळुंज, दिलीप वाळुंज, मंच्छिद्र खामकर, सुरेश वाळुंज , कांचन अरुण नवले, संगिता विक्रम वाळुंज अदिंनसह अनेक सभासद बांधव उपस्थित होते.

# सीएससी केंद्र चालकाने हडपले लाडक्या बहिणींचे पैसे:७१ जणांचे आधार कार्ड वापरुन मिळवले ३ लाख रुपये, नांदेड येथील प्रकार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड (वृत्तसंस्था)

राज्य सरकारने महिलांसाठी आणलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत अनेकजण गैरव्यवहार करून पैसे हडपण्याचे प्रकार समोर येत आहेत. सातारा, अकोला जिल्ह्यातील प्रकरणे ताजी असतानाच आता नांदेड जिल्ह्यात देखील त्यापेक्षा वेगळा प्रकार समोर आला आहे. नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील एका सीएससी केंद्र चालकाने आधार कार्डवर खाडाखोड करून लाडक्या बहिणींचे सुमारे ३ लाख रुपये हडप केले आहेत. हा प्रकार समोर आल्यानंतर प्रशासानाने चौकशीचे आदेश दिले आहेत. आपले बिंग फुटताच केंद्र चालक फरार झाला आहे.नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील मनाठा येथील सीएससी केंद्र चालकाने लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरताना महिलांच्या आधारकार्डसोबत छेडछाड केली. पोर्टलवर महिलांचे आधारकार्ड नंबर टाकण्याऐवजी त्यांच्या पतीचे आधारकार्ड नंबर टाकले. त्यानंतर रोजगार हमी योजनेचे पैसे आणि इतर योजनांचे पैसे आले आहेत, असे सांगून त्याने अनेकांचे आधारकार्ड आणि बँकेचे पासबुक जमा करून घेतले. याच कागदपत्रांच्या आधाराने त्याने महिलांच्या खात्यात आलेले लाडकी बहीण योजनेचे पैसे स्वत:च्या खात्यात जमा करून घेतले. लाडकी बहीण योजनेचे पैसे खात्यावर आल्यानंतर रोजगार हमी योजनेचे पैसे आले आहेत, असे सांगून त्या केंद्र चालकाने पुरुषांचे अंगठे घेतले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904